# महेश सहकारी बँक लि.,पुणे

मु.कार्यालयः प्लॉट नं.३७२,७३,७४, मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे ४११०३७

E-mail msbl@maheshbankpune.in www.maheshbankpune.in

फोन : (०२०)२४२६३३४१/४२/४३


**प्रति,**

**मा.सभासद,**

**(यादीप्रमाणे)**

**विषयः क्रियाशील सभासद निकष पूर्ततेकरिता सूचना/नोटीस/आवाहन**

महोदय/महोदया,

आपण बँकेचे सन्माननीय सभासद आहात. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ यामध्ये झालेल्या ९७ व्या घटना दुरूस्ती व पोटनियम दुरूस्तीनुसार अक्रियाशील सभासद व थकबाकीदार सभासदांना येणाऱ्या आगामी बँकेचे संचालक मंडळ निवडणूकीत भाग घेता येणार नाही व मतदान करता येणार नाही, असे आपणांस यापूर्वी वेळोवेळी कळविण्यात आलेले आहे.

दि.३०.०३.२०२० पासून तुम्ही अक्रियाशील सभासद म्हणून आहात आणि तुमचे नांव बँकेच्या अक्रियाशील सदस्यांचे यादीमध्ये दाखल करण्यात आले आहे.

तरी सभासदांना विनंती की, खालील अटींची पूर्तता करून आपले नांव क्रियाशील सभासदांच्या यादीत समाविष्ट होण्यासाठी नजिकच्या शाखेत संपर्क करावा, ही विनंती.

**क्रियाशील सभासदाचे निकषः**

१) किमान भाग रक्कम रू.१५००/- (६० भाग प्रति रू.२५/- प्रमाणे) धारण करणे आवश्यक.

२) बँकेकडील ठेव खात्यांमध्ये (बचत/चालू/रिकरिंग/मुदत ठेव या सर्व ठेव खाती मिळून) किमान रू.७,०००/- ठेव असावी किंवा कर्जदार म्हणून बँकेकडून किमान रू.१,००,०००/- इतकी रक्कमेची मंजूरी/उचल घेतलेली असावी.

**थकबाकीदार अपात्रताः**

सभासद स्वतः थकाबाकीदार असेल किंवा थकबाकीत असलेल्या कर्ज खात्यास जामिनदार असेल अशा सभासदांची नांवे ``थकबाकीदार सभासद'' यादीत समाविष्ठ होतील. त्यांना महाराष्ट्र सह.संस्था अधिनियम १९६० व उपविधीनुसार संचालक मंडळाचे निवडणूकीत भाग घेता येणार नाही व मतदानाचा अधिकार राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी व थकबाकीचा भरणा करून बँकेस सहकार्य करावे हि विनंती.

आपला विश्वासू,

**(एस.आर.करवा)**

**प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी**

**नोटः**

१) ज्या सभासदांनी उपरोक्त अटींची यापूर्वीच पूर्तता केलेली आहे त्यांनी पुन्हा पूर्तता करण्याची आवश्यकता नाही.

२) तसेच तसेच बँकेच्या सर्व सभासदांना आवाहन करण्यात येते की, ९७ व्या घटना दुरूस्ती प्रमाणे सर्व व्यक्तीगत सभासदांनी रिझर्व्ह बँकेने लागू केलेल्या- **``आपला ग्राहक ओळखा'' (केवायसी)** योजनेनुसार आपले सभासद खात्यावर केवायसी पूर्तता करून घेणे आवश्यक आहे. त्यानुसार **आपण अद्याप आपल्या सभासद खाती केवायसी पूर्तता केली नसेल तर ती पूर्ण करण्यात यावी.**